# ‘मेट्रो ३’च्या भुयारीकरणाचा ४०वा टप्पा पूर्ण

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या ‘मेट्रो-३’ मार्गावरील महालक्ष्मी मेट्रो स्थानकावर भुयारीकरणाचा ४० वा टप्पा यशस्वीरीत्या पार पडला. ‘तानसा-१’ या रॉबिन्स बनावटीच्या टनेल बोरिंग मशीनद्वारे सायन्स म्युझियम मेट्रो स्थानक ते महालक्ष्मी मेट्रो स्थानक हा डाऊनलाइन मार्गाचा ११३५.५ मी. भुयारीकरणाचा टप्पा एकूण ७५७ रिंग्सच्या साहाय्याने ३२५ दिवसांत पूर्ण करण्यात आला.

‘सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी स्थानकादरम्यान भुयारीकरण करणे अतिशय आव्हानात्मक होते. या टप्प्यातील भुयारीकरण पश्चिम रेल्वे मार्गावरील महालक्ष्मी आणि लोअर परळ रेल्वे स्थानकांदरम्यानच्या रेल्वेमार्गाच्या खालून करण्यात आले आहे. याशिवाय हे बोगदे जेकब सर्कल येथील महानगरपालिकेच्या १७ मीटर खोल भूमिगत गटार पम्पिंग स्टेशनच्या जवळ आहेत. त्यामुळे येथे भुयारीकरण करणे जिकिरीचे होते. मात्र हे शिवधनुष्य आमच्या समूहाने यशस्वीरीत्या पेलले,’ असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले. मेट्रो-३ मार्गिकेतील पॅकेज-३ मध्ये पाच स्थानके असून हा या मार्गिकेतील सर्वात लांब टप्पा आहे. या अंतर्गत मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी मेट्रो स्थानकांचा समावेश आहे.